# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २४४ वा ❑ शनिवार दि.२२ नोव्हेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# २१ व्या शतकात संस्कृती हाच संदेश -डॉ. वि ल धारूरकर

## एका भव्य सोहळ्यात जीवनगौरव पुरस्काराचे वितरण

**ज्योतिर्मय साहित्य**

**भुवनेश्वर (कैलास आतकरे)** -२१ व्या शतकात भारतामध्ये संस्कृती हाच संदेश आहे आणि प्रसार माध्यमांनी आपल्या देशाच्या सांस्कृतिक मूल्यांचे जतन केले पाहिजे असे विचार जीवनगौरव पुरस्कारा नंतर केलेल्या भाषणात डॉक्टर विल धारूरकर यांनी व्यक्त केले

भुवनेश्वर येथील कलिंग इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस च्या सभागृहात सकाळी दहा वाजता हा सोहळा संपन्न झाला राष्ट्रीय माध्यम परिषदेच्या नवव्या अधिवेशनासाठी ६०० प्रतिनिधी उपस्थित होते

आपल्या भाषणात डॉक्टर धारूरकर पुढे म्हणाले की भारतामध्ये प्रसारमाध्यमांची संख्यात्मक वाढ झाली आहे पण त्यांच्या गुणात्मक विकासासाठी संशोधन आणि मूल्यमापनाची आवश्यकता आहे मॅक्लूहनने माध्यम म्हणजे संदेश असे सूत्र मानले होते परंतु भारतासारख्या देशात प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा विकास होत असला तरी आपल्यासाठी केवळ तंत्रज्ञान म्हणजेच संदेशवहन नव्हे तर संस्कृती म्हणजेच संदेश हे सूत्र समोर ठेवून आपणास उच्च भारतीय सांस्कृतिक मूल्यांचे जतन करणे आवश्यक आहे आपल्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनास पोषक असे विकास संज्ञापन गतिमान पणे केल्यास भारताच्या राष्ट्रीय विकासाला नवी गतीला भेल आणि भारत जगातील दुसऱ्या तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनू शकेल असेही ते म्हणाले दुपारच्या सत्रात त्यांचे जेनेसिस ऑफ फेक न्यूज या विषयावर एक तासाचे स्वतंत्र व्याख्यान झाले त्यामध्ये त्यांनी फ ेक बातम्यांची रचना त्यामागचे तंत्र आणि त्याचे परिणाम यावर प्रकाश टाकला

आयआयटी भुवनेश्वरचे संचालक अश्विनी नंदा यांचे कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर व्याख्यान झाले त्यानंतर कोपल विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर बी के रवी यांनी कृत्रिम प्रज्ञा तंत्राबद्दल मौलिक विचार मांडले प्रोफेसर के व्ही नागराज यांनी वर्तमान संदर्भात भारतीय माध्यमांची जबाबदारी स्पष्ट केली . प्राध्यापक डॉक्टर उपेंद्र




पाडी संचालक एनएमसी यांनी प्रास्ताविक भाषण केले मान्यवर पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक देववानी मुखर्जी यांनी केले तर शेवटी मनोरंजन पांडा यांनी सर्वांचे आभार मानले

# विशेष लेख...

## संतुलित निर्णय

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती व राज्यपालांच्या अधिकारावर निर्णय देताना संतुलित निर्णय देत संविधानिक मर्यादा पाळण्याचे बंधन राष्ट्रपती व राज्यपालांनी पाळावे असे निर्देशही दिले. विधिमंडळांनी संमत केलेल्या विधेयकांना मंजुरी देण्यासाठी न्यायालये राष्ट्रपती आणि राज्यपालांना वेळेची मर्यादा घालू शकतात का, यासह १४ प्रश्नांवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाला कलम १४३ (१) अंतर्गत मत मांडायला सांगितले होते.यावर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देत संविधानिक मूल्य व संविधानिक तत्व कायम राखत संतुलित निर्णय दिला. १४ मे रोजी राष्ट्रपतींनी त्यांचे मत मागितले.

यापूर्वी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि आर. महादेवन यांनी एका अभूतपूर्व निर्णयात, तामिळनाडू विधानसभेने मंजूर केलेली १० विधेयके, जी तामिळनाडूच्या राज्यपालांकडे प्रलंबित होती, औपचारिक संमतीशिवाय मंजूर केलेली मानली होती. खंडपीठाने आणखी पुढे जाऊन राज्यपाल आणि राष्ट्रपतींना विधानसभेने मंजूर केलेली विधेयके मंजूर करण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी एक कालमर्यादा निश्चित केली. त्यानंतर, राष्ट्रपतींनी त्यांचे मत मागितले.

'राज्यांच्या विधिमंडळांनी संमत केलेली विधेयके मंजूर करण्यासाठी न्यायालये राज्यपाल आणि राष्ट्रपतींना कालमर्यादेचे बंधन घालू शकत नाहीत तसेच 'विधेयके मंजूर करण्यास उशीर झाला, तर ती आपोआप मंजूर झाले' (डीम्ड असेंट), यालाही न्यायालये मंजुरी देऊ शकत नाहीत,' असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या नेतृत्वाखाली पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने एकमताने हा निर्णय दिला. मात्र 'राज्यपालांना कलम २०० अंतर्गत योग्य ती प्रक्रिया पार न पाडता विधेयके रोखून धरण्याची परवानगी दिली, तर ते संघराज्याच्या हिताविरोधात राहील. विधिमंडळाने मंजूर केलेली विधेयके रोखून धरण्याचे सर्वाधिकार राज्यपालांना आहेत, असे आम्हाला वाटत नाही,' अशीही टिप्पणी न्यायालयाने केली.

विधिमंडळांनी मंजूर केलेले विधेयक राज्यपालांकडे आले, तर त्यांच्यापुढे तीन पर्याय असतात. विधेयक मंजूर करणे, ते फ ेरविचारासाठी परत विधिमंडळात पाठविणे किंवा राष्ट्रपतींना ते पाहण्यास सांगणे. भारतासारख्या लोकशाही देशात राज्यपालांना कालमर्यादेचे बंधन घालणे हे राज्यघटनेने त्यांना दिलेल्या लवचीक अधिकारांच्या विरोधात होईल,' असे न्यायालयाने सांगितले.

कलम २०० अंतर्गत राज्यपालांच्या अधिकाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, ''राज्यपालांच्या विद्वत्तेवर न्यायालय प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाही. पण (विधेयके मंजूर करण्यासंदर्भात) 'दीर्घ काळ, कुठल्याही कारणांव्यतिरिक्त, अमर्यादित निष्क्रियता' न्यायिक पुनरावलोकनाच्या कक्षेत येते. राज्यपालांनी कुठलाही निर्णय न घेता दीर्घ काळ विधेयके रोखून धरली, तर न्यायालये त्यांना कृती करण्याचे आदेश देऊ शकतात.'' राज्यपालांनी विधेयके रोखणे घटनात्मक तत्त्वांच्या विरोधात आहे. विधेयकांमध्ये चुकीचे काही आढळल्यास ते विधिमंडळाकडे परत पाठवले पाहिजे, असे न्यायालयाने सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने ८ एप्रिल रोजी तामिळनाडूच्या राज्यपालांनी प्रलंबित ठेवलेल्या विधेयकांना दिलेली ''मानली संमती'' देखील अयोग्य असल्याचे म्हटले.आपल्याच दिलेल्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने फेरविचार करून दिलेला निर्णय बदलून टाकला

# शिक्षणाच्या उगमापासून...

**ज्योतिर्मय साहित्य**



शिक्षण ही एक अविरत चालणारी प्रक्रिया आहे सतत प्रवाहीपणे वाहणाऱ्या नदीसारखी प्रवाही जे भेटेल जसे भेटेल त्याला ज्ञानाने समृद्ध करत पुढे वाहत जाणारी अशी शिक्षण प्रक्रिया आहे. मानवाची जडणघडण सर्वांगीण विकास शिक्षणातून होत असतो प्रत्येक गोष्टीतून, कृतीतून करावयाच्या प्रत्येक निरीक्षणातून मानव शिक्षण मिळवत असतो ज्ञान प्राप्त करत असतो.



प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230


मानवाच्या उगमापासूनच शिक्षणाचा उगम झाला असे म्हटले तरी वावगे ठरू नये. कारण मानवाच्या उत्पत्ती नंतर मानवाने जे काही शोध लावले, जी काही कृती केली ते सर्व निरीक्षणातून प्राप्त झालेल्या शिक्षणातूनच. त्याला तिथे कोणी शिकवायला नव्हते होता कोणी त्याला शिकवले याचा विचार केल्यावर असे लक्षात येते की त्याचाही गुरु होता तोही या शाळा, शिक्षक, ट्युशन, अकॅडमी असले काहीही नव्हते. तरीही मानवाच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणणारे शोध त्याने लावले. असे म्हणतात की गुरु शिवाय शिक्षण मिळत नाही मग आदीमानवाचा गुरु कोण गुरूच्या मार्गदर्शनाखाली शिकला त्या गुरुचे नाव आहे निसर्ग आपण नेहमीच म्हणतो निसर्ग हा मानवाचा सर्वात मोठा गुरु आहे ते इथे सत्य वाटते.


काळाच्या ओघात शिक्षणाच्या पद्धतीतही बदल होत गेले तसे बदल होणे अपेक्षितच आहे. प्राचीन काळात ऋग्वेद, सामवेद, अथर्ववेद, यजुर्वेद यासारखे ग्रंथ लिहिले गेले त्यात मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाचा निसर्गाच्या प्रत्येक घटकाचा विचार करून लिहिले आहे. हे ग्रंथ लिहिले गेले तेव्हा गुरुकुल पद्धती अस्तित्वात होती. गुरुच्या आश्रमात राहून ज्ञानसाधना केली जायची. स्वावलंबी जीवन जगण्याचे शिक्षण तिथे दिले जात असे.

**(क्रमशः)**










## जात्यावरच्या ओव्या......

वैराळ दादा
तुझा धंदा रे काचेचा
भर हळूच बांगडी
हात नाजूक लेकीचा ॥३५७॥

वैराळ दादा
बांगडीला रे किंमत
बाई जन्माची सारी
हिला ठाऊक गंमत ॥३५८॥

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## रातोंके साये घने...




ज्योतिर्मय साहित्य

जेव्हा जीवनामध्ये निराशा आपल्याला घेरते तेव्हा आपले आवडते छंद आपल्याला जीवन जगण्याची ऊर्जा देतात. अशी ऊर्जा देणाऱ्या साधनांमध्ये निसर्ग, आपल्याला प्रसन्नता देणारे संगीत, आवडणारी आणि वेगळ्या विश्वात घेऊन जाणारी पुस्तके, जगण्याची ऊर्जा देणारे आपले मित्र यांचे स्थान कोणी घेऊ शकत नाही. या सगळ्या गोष्टी निराशेचा अंधार दूर करून तुमच्या जीवनात आनंदाची पहाट आणण्यासाठी अत्यंत उपयोगी आहेत. आज मला असेच एक सुंदर गाणे आठवते आहे. निराश परिस्थितीत वाट दाखवणारे, मरगळलेल्या मनाला उभारी देणारे. ते गाणं आहे अन्नदाता या चित्रपटातलं. या गीतात चारच कडवी आहेत पण ज्यांच्या कंठातून प्रत्यक्ष सरस्वती गीताचे बोल होऊन प्रकटते अशा लता मंगेशकरांच्या सुरांनी या गीताला अप्रतिम सामर्थ्य प्रदान केले आहे. कवी योगेश यांच्या गीताला सलील चौधरी यांचं संगीत आहे. जया भादुरीचा पडद्यावरील समर्थ अभिनय पाहण्यासारखा आहे.




गीताची सुरुवात लता मंगेशकरांच्या हळुवार सुरांनी होते. रातोंके साये घने... या शब्दांनी गाण्याची सुरुवात होते. हळूहळू आवाज वरच्या पट्टीत जायला लागतो. एका वेगळ्याच ट्रान्समध्ये हे गाणं आपल्याला घेऊन जातं. आपल्या सगळ्यांना रात्र संपून पहाटेची प्रतीक्षा असते. रात्र संपून पहाटेची प्रतीक्षा करणे हे जीवनातील आशेचे प्रतीक आहे. संकटे, समस्या म्हणजे जणू आपल्या जीवनातील काळोखी रात्र !

गाण्याच्या पहिल्या कडव्यात कवी म्हणतो

*रातोंके साये घने जब बोझ दिल पे बने*
*ना तो जले बाती ना हो कोई साथी*
*फिर भी न डर अगर बुझे दिये*
*सहर तो हैं तेरे लिये*

रात्रीच्या काळोखाची भीती मनावर असेल, आजूबाजूला कोणताच दिवा प्रकाशमान दिसत नाही. साथीलाही कोणीच नाही. अशा वेळी हे मना, घाबरू नकोस. लक्षात ठेव की पहाट तुझ्यासाठीच आहे. हा अंधार, ही रात्र संपणार आहे. ( सहर हा उर्दू शब्द आहे. सहर म्हणजे पहाट. )

(क्रमशः)




## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सृष्टीकथन

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार

आपण पाचव्या समासात ब्रम्ह आणि माया यांचा संबंध कसा आहे त्यांची लक्षणे कोणती. मानवी बुद्धीच्या पध्दतीने ज्ञानमय ब्रम्ह आणि अज्ञानमय माया यांची तुलना करण्याचा प्रयत्न समासाच्या आधारे केला. समर्थ तत्वज्ञानाच्या आधार घेऊन आपण त्या समासातील अज्ञान, अविद्या, भ्रम, अध्यास, देहबुध्दी हा सर्व मायेचा पसारा आहे. हा मोलाचा विचार आपण शिकलो. माया आणि ब्रम्ह यांचा अभ्यास या समासात केला. समर्थाचे तत्वज्ञान समजून घेण्यासाठी त्याचे परत परत मनन,चिंतन केले पाहिजे हे मात्र खरे आहे.

ब्रम्ह आणि माया मध्ये मायेचे आहे पणाचे गुण ब्रम्हाला नाही पणाने लावले आहेत. त्याचे कारण असे की परमार्थाच्या बाजूने विचार केला तर जगात माणसाचे फक्त दोन वर्ग आहेत.

एक जाणता दुसरा नेणता.

जाणते पुरूष आत्मज्ञानी तर नेणते पुरुष मायाज्ञानी असतात. आत्मज्ञानी पुरूषांना ब्रम्ह साक्षात अनुभवास येते. तर अज्ञानी पुरूषाला माया प्रत्यक्ष प्रचीती स येते.अज्ञानी लोकांना दृष्य जग कितीही खरे वाटले तरी ते खरे नाही. कारण ‘‘काय भुललासी वरलीया रंगा‘‘ हे जर खरे आहे पण अज्ञानाचे झापड त्यांच्या डोळ्यावर ऐवढे घट्ट बसलेले असते की माया त्यांना खरी वाटू लागते.

यावरून समर्थ म्हणतात की ज्ञानी पुरूष ज्यावेळी अज्ञानी लोकांना ब्रम्ह कसे आहे हे सांगू लागतो त्यावेळी तो मायेचे एक लक्षण घेतो. आणि ते लक्षण ब्रम्हाच्या ठिकाणी नाही असे सांगतो. म्हणून ब्रम्ह अनाम, अरूप, अक्रिय,असाक्ष अलक्ष, अपार, अप्रत्यक्ष, निर्विकार, निराकार, निराभास,

निर्गुण, निरूपाधिक, वर्णहीन,अविनाश, अव्यकक्त,


अकर्ता,अद्वैत आहे. असे सांगावे लागते. या समासात जगतमिथ्या आहे हे मत परत परत मांडले आहे. खरेखोटे यांचे मिश्रण म्हणजे मिथ्या होय. ज्ञानी पुरूषाला जगत् परमात्म स्वरूप दिसते तर अज्ञानी लोकांना तेच द्रुष्यरूप दिसते. दोघाच्या बाजूने विचार केला तर दोघेही आप आपल्या द्रुष्टीने खरें आहेत. पण पहिला म्हणतो ‘‘स्रुष्टीपूर्वी ब्रम्ह असे।तेथे स्रुष्टीमुळीचं नसे।

आता स्रुष्टी दिसत असे। ते सत्य किं मिथ्या. पण पहिला अनुभव यथार्थ तर दुसरा अयाथार्थ असतो. म अज्ञानी माणसांने सध्याचा अनुभव हाताशी धरून ज्ञानी पुरूषांच्या मदतीने व सारासार विचाराने आत्मज्ञानी व्हावे. ते कसे याचा संपूर्ण अभ्यास आपण या ‘‘स्ररुष्टीकथन‘‘ समासात करणार आहोत.

संपूर्ण समास ६० ओव्यात गुंफलेला आहे हळूहळू पण समजेल अशा साध्यासुध्या मार्गाने आपण त्याचा अभ्यास करणार आहोत.

(क्रमशः)

## सत्समागम म्हणजे संत सांगतील त्याप्रमाणे वागणे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

कोणत्याही मंगल कार्यात सर्वाआधी गणपतीचे आवाहन करतात, आणि सगळे कार्य संपले की सर्वांचे शेवटी त्याचे विसर्जन करतात. त्याप्रमाणे अनुसंधानानेच पोथीला सुरुवात करावी आणि अनुसंधानानेच पोथीची समाप्ती करावी. लौकिक कार्यामध्ये गणपतीचे विसर्जन झाल्यावर आपण शिल्लक उरतो, पण अनुसंधानाचे विसर्जन करताना आपणही त्यात नाहीसे व्हावे. ‘‘जसे ठेवायचे असेल तसे ठेवा, पण आपला विसर पडू देऊ नका, एवढी भीक घालावी,’’ अशी गुरूच्या चरणी प्रार्थना करावी.

भगवंताला विसरून भजन करू नका. भगवंताची आठवण ठेवून भाजी जरी आणली तरी त्याचे श्रेय जास्त आहे. जगाच्या लाजेला भिऊन भगवंताला अंतर देऊ नये. ‘मी कोण’ याचा विचार करावा, आणि तो करण्यासाठी, ‘मी नाही कोणाचा’ हे बघावे. मी आप्तेष्टांचा, बायको-मुलांचा, आईबापांचा तर नाहीच, पण मी देहाचा आणि मनाचाही नाही; असे करता करता जो राहील तो मी. खरे समाधान एकपणात आहे, अद्वैतात आहे. म्हणून, द्वैताचा जनक जो अभिमान तो कमी कसा होईल हे बघावे. याकरिता, मी कर्ता नसून देव कर्ता आहे असे मानावे, सर्वांभूती भगवद्भाव पाहावा, सत्समागम करावा. सत्समागम म्हणजे सत्याचा समागम. सत्पुरुषाच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे. संतांवर अनन्य श्रद्धा ठेवा. त्यांच्या चालीने चाला. त्यांच्या समागमात दैन्य मानू नका. जे तुमची एकसारखी विषयातली नडच भागवतील ते संत नव्हेत. खरे संत विषयाची आसक्ती कमी करतात; अशा संताला शरण जावे. निर्विषय चित्त संतांनाच करता येते. संत हे ईश्वरदर्शनाची तळमळ उत्पन्न करतात. तळमळ उत्पन्न करून देणे हीच संतांची कामगिरी. संतांची भाषा तळमळीची असते, म्हणून ती तळमळ उत्पन्न करते. संत सांगतील त्याप्रमाणे वागावे. जग संतांशिवाय असणेच शक्य नाही. जे देहात दिसले पण वस्तुत: देहातीत राहिले ते संतच होत. आम्हांला त्यांना ओळखता येत नाही याला काय करावे ? नामाच्या योगानेच संत ओळखता येतात, जोडता येतात आणि टिकवता येतात. जो भगवंताचे नाम घेईल त्याला संत भेटेल, आणि तो त्याला भगवंताची प्राप्ती करून देईल. त्याचे कुठे अडणार नाही. पण जो नुसत्या शब्दज्ञानाच्या मागे लागेल त्याला आसक्ती सुटणार नाही, आणि त्याचे जीवन सार्थकी लागणार नाही.

संताच्या पदरात पडले की तो आपली लाज राखतो.




## लहान मुलांच्या मनावरही असतो स्ट्रेस

ज्योतिर्मय साहित्य

लहान मूल म्हणजे मातीचा गोळा असतो, त्याला जसा आकार देऊ तसं ते घडत जातं. मुलांची पहिलीं ५ ते७ वर्ष अतिशय महत्त्वाची असतात. त्यांना आपण ज्या सवयी लावू, जसे संस्कार करु तसे आयुष्यभर त्यांच्यासोबत राहतात. यामुळे आपण लहानपणी त्यांना खाण्या-पिण्याच्या, स्वच्छतेच्या किंवा इतरही अनेक चांगल्या सवयी लावतो. मात्र मुलांच्या मानसिकतेकडे आपलं काही वेळा दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. पण मूलांच्या मनावर काही ना काही गोष्टींचे सतत दडपण असण्याची शक्यता असते. आणि वेळीच आपण हे दडपण दूर केले नाही तर भविष्यात त्यांना मानसिक ताणतणावाला सामोरे जावे लागू राकते. लहानपणीच मुलांना योग्य त्या सवयी लावल्या नाहीत तर भिती, निराशा एकटेपणा अज्ञा समस्यांना ते सामोरे जातात.

५० टक्के मुलांना वयाच्या १ वर्षापासून मानसिक समस्या असण्याची शक्यता असते. तर ७५ टक्के मुलांना त्यांच्य वयाच्या २० व्या वर्षी मानसिक अडचणींना तोंड द्यावे लागते. जी मुले आपल्या वयाच्या इतर मुलांसोबत खेळतात त्यांचे मानसिक आरोग्य अधिक चांगले असते असे केंब्रिज विद्यापीठात झालेल्या एका अभ्यासातून समोर आले आहे. इतरांसोबत खेळण्याने त्यांच्या अनेक क्षमता नकळत विकसित होतात आणि त्यांचा ताण कमी होण्यास मदत होते. त्यामुळे मुलांचे शिक्षण, आरोग्य, आहार यांबरोबरच मुलांच्या मानसिक आरोग्याचीही लहान वयापासून पालकांनी योग्य पद्धतीने काळजी ध्यायला हवी असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. यासाठी कोणत्या गोप्टींकडे लक्ष द्यायचे ते पाहूया.

भावना ओळखणे आणि व्यक्त करणे :

अनेकदा मुलांना आपल्या भावना कशा व्यक्त करायच्या हे लक्षात येत नाही. विशेषतः राग आल्यावर एखादी वस्तू फेकणे, आदळआपट करणे असे सर्रास केले जाते. मात्र असे न करता रागावर नियंत्रण कसे ठेवायचे. चिडचिड झाली तरी शांत राहण्यासाठी काय करायचे या गोष्टी मुलांना लहान वयापासूनच शिकवायला हव्यात. त्याचा मोठेपणीही त्यांना चांगला फायदा होतो आणि ते आपल्या भावना योग्य पद्धतीने व्यक्त करु शकतात.

नेमकं रुटीन असायला हवं :

रोजचं एक विशिष्ट रुटीन असणं मुलांच्या मानसिक वाढीसाठी अतिशय गरजेचे असते. जेवण्याचे, झोपण्याचे खेळण्याचे नेमके रुटीन असेल की अमुक वेळेला अमुक गोप्ट करायची असते हे त्यांच्या डोक्यात पक्के बसते. त्यामुळे त्यांचे जीवन आरोग्यदायी होते आणि त्याचा त्यांच्या मनावर आणि शरीरावर सकारात्मक परिणाम होतो.कोणत्याही वेळेला काहीही करायची सवय असेल तर मुलांना तशीच सवय लागते आणि जसजसे ते मोठे होतात तशी ही सवय अवघड पडते.

क्षमता आणि कौशल्ये विकसित करणे :

मूलांना आपण जसे शालेय शिक्षण देतो त्याचप्रमाणे त्यांना व्यवहार ज्ञानही शिकवणे आवश्यक आहे. समाजात वावरताना लोकांशी कसे बोलायचे, वागायचे याचे ज्ञान त्यांना असेल तर त्यांचे काम अडणार नाही.आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर येणाऱ्या अडचणींचा सामना करण्यासाठी मुलांना सक्षम बनवणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यासाठी त्यांना विविध कौश ल्ये लहानपणापासूनच शिकवायला हवीत. (क्रमशः)




## कुठलाही आजार आपल्याला का होतो.

ज्योतिर्मय साहित्य

तर त्याचे सहज सोपे उत्तर आहे. तुम्ही स्विकारल्यामुळे. आपल्या शरीरात पाण्यावर तरंगण्याची नैसर्गिक शक्ती आहे. पण तरीही माणूस पाण्यात बुडून मरतो. याला काय म्हणाल आपल्या मनाने अतिशय स्ट्राँगली स्विकारलेय की मला पोहायला येत नाही. आणि कोणालाही पोहायला येत नाही ही अंधश्रद्धा आहे. हत्ती किती जड आहे तोही पोहतो. कारण त्याने ठरवलेले नाही. त्याला माहीतच आहे तो पाण्यावर तरंणार आहे. अहो सापाला हात पाय नसतात. तोही पाण्यात पोहतो. म्हणजे हात पाय हलवले तरच आपण पाण्यावर तरंगू शकतो हाही गैरसमजच आहे. बघा जी माणसं पाण्यात बुडून मरतात त्यांचे शरीर काही वेळाने पाण्यावर तरंगायला लागते. याप्रमाणेच आपल्यात प्रतिकारशक्ती आहे. ती आपल्याला कसलाच आजार होवू नये यासाठी सतत काम करत असते. तिला मनापासून स्ट्राँगली मान्य करा, वापरा हेच खरे शरीर शास्त्र आहे. मेडीकल सायन्स ही शक्ती तुमच्यात नसेल तर काहीच करू शकत नाही. तर ताप आल्यावर, सर्दी झाल्यावर, शिंक आल्यावर कसलाही आजार झाल्यावर थोडे थांबा. तुमच्यातील प्रतिकारशक्तीला काम करू द्या.

अशा आजारांवर वारेमाप खर्च करणे शरीरावर अत्याचार आहेत. ही अंधश्रद्धा आहे. शरीरशास्त्रात नैसर्गिक प्रतिकारशक्ती म्हणजे खरे विज्ञान आहे.

आपल्या शरीरातली अर्ध्याहून अधिक आजारांच्या मागे आपलं अज्ञ मन असतं. पण कित्येकदा पेशंटला याची माहीती नसते. डॉक्टरांकडे गेलं आणि उपचार घेतले की तात्पुरतं बरं वाटतं, थोड्या दिवसांनी पुन्हा दुखणं, उफाळून येतं, काय करावं, ते समजत नाही.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

मन आणि शरीर यांना जोडणारी काही लक्षणे बघूया

१) एखाद्या गोष्टीची जबरदस्त भिती किंवा चिंता वाटली की घशाला कोरड पडते.

२) परिक्षेचा किंवा अजून कसला तणाव असेल तर पोटात गोळा येतो,

३) समोर एखादा अपघात किंवा दुर्घटना पाहीली की हातापायातली शक्ती गळून जाते.

४) आणि याविपरीत सतत हसतमुख असणारी व्यक्ती नेहमी क्वचितच आजारी पडते.

तर हे सिद्ध झाले आहे की, आपल्या शरीरातल्या आंतरिक क्रियांवरही अज्ञात मनाची सत्ता चालते. जसं की, समोर मातीचे कण उडाले की सेकंदाच्या दहाव्या भागात लगेच पापण्या मिटतात. अज्ञात मन शक्तीशाली आहे पण एखाद्या सेनापतीसारखं, त्याच्यावर सत्ता चालते विचारांची!

ताकतवर असला तरी तो गुलामच! दिलेला आदेश पाळणं एवढचं त्याचं काम!

आपण जशे विचार करतो तसेच आपले जीवनात घडते हा निसर्गाचा नियमच आहे

***




## शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं?

ज्योतिर्मय साहित्य

दुर्वास ऋषी प्रेरणादायक शब्द बोलले असते तर कदाचीत हनूमानात अपेक्षित बऱ्याच प्रकारचे चांगल्या प्रकारचे वर्तनबदल घडले असते. हे झालं चांगलं मार्गदर्शन. जर त्याच हनुमानाच्या शक्तीवर दुर्वास ऋषींकडून शापवाणी उच्चारली गेली नसती तर त्यांच्या हातून विनाशकही कामं झाली असती. जशी सुर्याला गिळणं. परंतु त्यांच्या सुप्त गुणात दुर्वास ऋषींकडून अडथडा निर्माण झाला व पुढे जावून कालांतरानं हनुमान ती शक्ती विसरला. अर्थात चांगला गुण विसरला. पुढे हाच गुण सीतेचा शोध लावतांना कामात आला. समुद्र होता व तो समुद्र टार करणे कोणाला जमेनासे होते. पूलही बनवायचा झाल्यास सीता लंकेत असेल का? हा प्रश्न होता. समजा ती लंकेत नसती तर. पूल बांधण्याचे प्रयत्न विफल झाले असते. शेवटी सीतेचा शोध लावायचा होता. त्यासाठी जांबवंतला आठवलं की बालपणात हनुमानात उडण्याची शक्ती होती. ज्या आधारे हनुमंत सुर्याला गिळायला गेला होता. ती शक्ती माहीत असलेला जांबवत सीतेचा शोध घेतेवेळी ती शक्ती आठवून म्हणाला, ‘‘हे हनुमंता तू आपली शक्ती आठव. आठव की तू भूतकाळात सुर्याला गिळायला गेला होता. आता तूच तशी उड्डाण भरुन हा समुद्र पार करुन जा. तूला सीतेचा शोध घेता येईल. हनुमंताला ती शक्ती आठवली व तो समुद्र पार करुन गेला. ज्यातून सीतेचा शोध लागला. पर्यायानं सांगायचं झाल्यास आपल्या विद्यार्थ्यातही असेच सुप्त गुण असतात. त्या सुप्त गुणांवर कोणत्याच दुर्वास नावाच्या शिक्षकानं शाप देण्याची गरज नाही की आपल्या विद्यार्थ्यातील हनुमंत ती शक्ती विसरेल. ज्याला सीतेचा शोध लावता येणार नाही. या ठिकाणी सीतेचा शोध म्हणजे एखाअःआ नाविन्यपूर्ण शोध असा आहे. तो शोध आहे की ज्यातून वस्तूनिर्मिती होईल व ती वस्तुनिर्मिती देशाला महासत्ता बनविण्याच्या कामी येईल. या दृष्टीनं आपल्यासाठी नाही तर आपल्या विद्यार्थ्यांसाठी आकारिक मूल्यमापनाची गरज आहे. बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकार अधिनियम २००९ मधील कलम २९ तसेच २० ऑगस्ट २०१० च्या शासननिर्णयानुसार विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासाचे सर्वच पैलूःचे सातत्याने व विविध अंगाने मूल्यमापन करणे. हेच आकारिक मूल्यमापन होय. अन् त्यासाठी वापरावयाची कार्यपद्धती म्हणजे सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन होय. यात आकारिक मूल्यमापन पद्धतीत दैनिक निरीक्षण, तोंडीकाम, प्रयोग, प्रात्यक्षिक, उपक्रम, कृती, प्रकल्प, चाचणी, स्वाध्याय, वर्गकार्य, प्रश्नावली. या सर्वांचा समावेश होतो. ज्यातून आपल्याला सुप्तगुण पाहायला मिळू शकतात व ते सुप्तगुण वाढविण्यास वाव मिळू शकतो. सुप्तगुण हे सर्वच विद्यार्थ्यात असतात. सुप्तगुण म्हणजू वाचन व लेखन येणे नाही. तर चांगले बोलता येणे, ज्यातून वक्ता तयार होवू शकतो. गाणे म्हणता येणे. ज्यातून संगीतकला वाढीस लागते. वाद्य वाजवता येणे, ज्यातून वादनकला वाढीस लागते. कोणाला भांडे बनवता येणे, ज्यातून कल्पकता वाढीस लागते, शोधक वृत्ती वाढीस लागते व शोध लावता येवू शकतो आणि सर्वात महत्वाचं म्हणजे, चित्र काढता येणे व लिहिता येणे. ज्यातून चित्रकार व लेखक बनवता येवू शकतं.

(क्रमशः)

# ५६व्या गोवा फिल्म फेस्टिवलचे थाटात उद्घाटन

## ‘The Blue Trail’ या चित्रपटाने उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**

पणजी (गोवा)आशिष नीनगुरकर : दक्षिण आशियातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवांपैकी एक असलेला आज आपल्या ५६व्या अंकासह गोव्यात उद्घाटित झाला. उद्घाटन चित्रपट म्हणून ब्राझीलचा दिग्दर्शित ‘द ब्लू ट्रेल ’ यांचं प्रदर्शन करण्यात आलं.



या महोत्सवात माहिती व प्रसारण मंत्रालयाचे राज्य मंत्री एल. मुरुगन, गोवाचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, मंत्रालयाचे सचिव संजय जाजू, तसेच महोत्सव संचालक शेखर कपूर उपस्थित होते दिग्दर्शक गब्राईल मसकरो यांनी सांगितले ‘‘हा चित्रपट एका वृद्ध स्त्रीबद्दल आहे, आणि आशा आहे की तो आपल्याला नेहमीच जीवनाचा अर्थ शोधण्याचा वेळ गेलेला नसतो हे सांगेल.’’

शेखर कपूर म्हणाले – ‘‘माझ्या मते दोन–तीन वर्षांत आपण १,००,००० लोकांपर्यंत पोहोचू आणि लवकरच आपण कानस फिल्म फेस्टिवल जितके मोठे होऊ.’’

‘द ब्लू ट्रेल’ हा चित्रपट ब्राझीलच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. ७७ वर्षीय तेरिसा नावाची नायिका समाजातील वयोवृद्धांवर असलेल्या ‘उपनिवेश’ व्यवस्थेशी लढत स्वतःचा मार्ग शोधते, आणि ॲमेझॉन प्रवासाद्वारे स्वतःला उडण्याचा अनुभव घेण्याच्या धाडसी प्रवासावर निघते. हा उद्घाटनप्रसंग च्या ९ दिवसांच्या कार्यक्रमाची सुरुवात ठरला आहे, ज्यामध्ये चित्रपट प्रदर्शनांबरोबर मास्टरक्लासेस, निर्माता–नेटवर्किंग, संवादपर सत्रेही होणार आहेत.

# ‘असंभव’ चित्रपटातील ८० लूकची सर्वत्र चर्चा

**ज्योतिर्मय साहित्य**

सध्या सोशल मीडियावर नवनवीन ट्रेंड्सची रेलचेल सुरू असतानाच मराठी चित्रपटसृष्टीत एक अनोखा आणि आकर्षक ट्रेंड जोरदार व्हायरल होत आहे. सचित पाटील दिग्दर्शित ‘असंभव’ चित्रपटाच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेला ‘असंभव८०’ हा ट्रेंड सेलिब्रिटींपासून ते प्रेक्षकांपर्यंत वेगाने पसरत आहे.



एआयच्या मदतीने ८०च्या दशकातील लूक साकारून या ट्रेंडमध्ये मराठी चित्रपटसृष्टीतील सुमित राघवन, अंकुश चौधरी, अवधुत गुप्ते, सुबोध भावे, अभिजीत पानसे, आनंद इंगळे, संतोष जुवेकर, पुष्कर श्रोत्री, सुयश टिळक, प्रिया बेर्डे, रेशम टिपणीस, कविता लाड, गौरी कुलकर्णी याच्यासह अनेक कलाकारांनी त्याच्या सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. या कलाकारांच्या ८०च्या दशकातील लूकवर चाहत्यांच्या जबरदस्त प्रतिक्रियाही येत आहे. ‘असंभव८०’ हा ट्रेंड व्हायरल होण्याचे कारण म्हणजे ‘असंभव’ चित्रपटातील ८०च्या दशकातील ग्लॅम लूक! चित्रपटातील कलाकारांच्या गेटअपने सर्वांनाच भुरळ घातली आहे. रिलीजपूर्वीच सोशल मीडियावर मिळत असलेला प्रतिसाद हा चित्रपटाविषयी प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढवत आहे. चित्रपटातील वेशभूषा, रंगसंगती, सेट डिझाइन आणि कलाकारांचे गेटअप आधीच चर्चेचा विषय झाले आहेत.

‘असंभव’चे दिग्दर्शन सचित पाटील यांनी केलं असून पुष्कर श्रोत्री यांनी सह–दिग्दर्शनाची जबाबदारी सांभाळली आहे. मराठीतील चार गुणी कलाकार सचित पाटील, मुक्ता बर्वे, प्रिया बापट आणि संदीप कुलकर्णी पहिल्यांदाच या चित्रपटाच्या निमित्ताने एकत्र पडद्यावर झळकणार आहेत. मुंबई पुणे फिल्म्स एंटरटेनमेंट’चे सचित पाटील आणि नितीन प्रकाश वैद्य हे चित्रपटाचे निर्माते असून, एरिकॉन टेलिफिल्म्सच्या शर्मिष्ठा राऊत, तेजस देसाई आणि पी अँड पी एंटरटेनमेंटचे मंगेश परुळेकर व संजय पोतदार हे सहनिर्माते आहेत. ‘असंभव’ हा चित्रपट आजपासून सर्वत्र प्रदर्शित झाला आहे.



### बालदीन महत्वाचा...

ए...
पहिले का... कसा मस्त झोपलाय...
चित्र पण भारी काढलंय...
अगं, जाऊदे ना...
इतक्या उशिरापर्यंत कोणी झोपत का?
दिलं असेल आईवडिलांनी हाकलून...
आईवडील आहे का नाही?
लिव्ह इन मध्ये राहणाऱ्यांचे पण असू शकेल!
पण आपल्याला काय करायचे?
थंडी मध्ये रात्रभर कुडकुडत असणार...
दिवसभर भीक मागत असणार...
आईच्या कुशीत, गर्भात असताना...
असे काही वाटत असणार!
पण जाऊदे बाई... एवढा वेळ आहे का?
ज्याच्या त्याच्या कर्माची फळे भोगावी लागतात...
त्यात आपण काय करू शकतो? काहीच नाही...
ते बाकीचे लोक असतील ना... रिकामचोट...
लहान मुलांच्या भावना, शिक्षण, आरोग्य...
वगैरे वगैरे समजून घेऊन...
महान कार्य करणारे वगैरे वगैरे...
पण खरंच ... चित्र तर खूप चांगले...
पण त्यात तो भिकारी...
सगळा आनंद घालवून टाकतो...
अगदी त्याने काढले असेल तरीही...
भिकाऱ्यांचे असेच असते ...
आपण लक्ष देऊ नये... विनाकारण त्रास होतो...
ब्लड प्रेशर, डायबिटीस, हार्टला...
आपल्याला आपली काळजी घ्यावी लागते...
चल लवकर...
शाळेत बालदिनाच्या कार्यक्रमाला उशीर होतोय...
तो कार्यक्रम महत्वाचा!

@सतीश इंदापूरकर, पुणे




# श्री रामेश्वर धाम

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रभू रामचंद्रांनी याचा स्वीकार केला. रावण सीतेसह लंकेत परत निघाला.

एका अख्याइके नुसार रावण वध झाला. ब्रह्म हत्येचे पातक रामास लागले. त्याचे निरसन करण्यासाठी प्रभू रामचंद्र लक्ष्मण सीते सहीत पुनश्च रामेश्वरम येथे आले. त्यांनी शिवलिंगाची स्थापना केली. या पूजेसाठी प्रभू रामचंद्रांनी ध्यानावस्थेत जाऊन मृत रावणास या पूजेसाठी निमंत्रित केले. व रावणाने आपल्या दिव्य देहानीशी प्रगट होऊन पूजा विधि संपन्न केला.

एका अन्य कथेनुसार दक्षिण भारतात रामनाथ पुरम जिल्ह्यात रावण पौरोहित्य कोंडम म्हणून एक लहान उपमंदिरही दाखवले जाते. जिथे असे म्हणतात की, रावणाने मंत्रोच्चार केला.

स्कंद पुराण सेतू महात्म अध्याय आठ यामध्ये याचा सुचक उल्लेख आहे



रावोपी
तदा प्राप्तो रुद्र भक्ती परायण:/
प्रतिष्ठां
कारयामास रामेश्वर मितीघ्ण//

रामेश्वर येथील मणी दर्शन

ज्यावेळेस प्रभू रामचंद्रांनी ब्रह्मतेचे पातक नष्ट करण्यासाठी श्री राम लिंगाची स्थापना केली, त्यावेळेस शेषनागाने आपला मणी प्रभू रामचंद्रास अर्पण केला. त्या स्फटिकाच्या मण्याचे लिंगात रूपांतर केल्या गेले. दररोज प्रातःकाळी चार ते सहा या वेळेत या स्पटीक रूप लिंगाचे दर्शन मुख्य मंदिरात करता येते. यावेळेस शुभ्र वस्त्रे परिधान करून मंदिरात भाविक जातात. पारदर्शक असणाऱ्या या स्पटिक रूप मणी दर्शनाने आपली पापे नष्ट होतात. अशी श्रद्धा लोकांत आहे. यानंतर अग्नी तीर्थ स्नान व २२ कुंडांचे स्नान करून त्यानंतर रामलिंगम आणि विश्व लिंगम यांचे दर्शन करावे असा प्रघात आहे.

रामेश्वर या पवित्र स्थळी आजवर हजारो लाखो भक्त येऊन गेले आहेत. संत एकनाथ महाराज ही काशीवरून गंगेच्या पाण्याची कावड भरून ती रामेश्वरास घेऊन निघाले होते. काशी ते रामेश्वर हे प्रचंड मोठे अंतर त्यांनी पायी चालत पूर्ण केले. आणि आता रामेश्वरच्या अगदी नजीक ते आले होते. ईथवर सांभाळत आणलेली गंगेच्या पाण्याची कावड त्यांनी एका तहानेने तळमळणाऱ्या गाढवाला पाणी पाजून संपविली. त्यांच्यासोबतचे इतर लोक म्हणू लागले, ‘‘एक नाथा, तुम्ही काय करता? अहो ही गंगेची कावड, हजारो किलोमीटर वरून आपण रामेश्वरास अभिषेक करण्यासाठी आणली आहे, आणि तुम्ही अगदी थोडक्या करता हे दुर्मिळ जल गाढवाच पासून मोकळे झालात. एकनाथ महाराज म्हणाले ‘‘अरे ते गाढव तहानेने व्याकुळ झाले होते, त्याच्यातही तोच परमात्मा आहे ना? मग त्याला तहानलेला पाहून आपण मंदिरातील परमेश्वरास पाणी देण्यास जाऊन काय अर्थ आहे ?सर्व सोबत्यांसह एकनाथ महाराज मंदिर परिसरात रिकाम्या हस्ते गेले. रात्री मुक्काम केला. त्या रात्री मंदिरातील पुजाऱ्याच्या स्वप्नात भगवान महादेव प्रकट झाले. ते म्हणाले की मला महाराष्ट्रातून आलेल्या संत एकनाथ यांचेच जल प्राप्त झाले आहे. इतरांचे नाही.

आपण जेव्हा रामेश्वर येथे जाऊ त्यावेळेस आपल्याला संत एकनाथ महाराज यांनाही आठवून विनम्र व्हावेसे वाटले तर नवल नाही. महादेवाचे दर्शन घेताना एक दर्शन एकनाथांच्याही नावाने घ्यावे.

त्याच पवित्र भूमीत प्रभू रामचंद्र सीतामाय लक्ष्मण यांचीही पावले उमटून ती भूमी पवित्र झाली आहे. त्या भूमीला वंदन करून त्या तीर्थात आपण स्नान करावे. पुन्हा अशी पापे आपण हातून होऊ नयेत हा निश्चय करून आपण जेव्हा बाहेर पडू तेव्हा निश्चितच आपल्या पूर्व काळात घडलेल्या सर्व पापाची निवृत्ती झाल्याशिवाय राहणार नाही. आणि रामेश्वरम ची यात्रा सफल झाली आहे अशी आपली भावना होईल.

जय भोले, जय जय भोले !
जय श्रीराम, जय जय श्रीराम !

# शेख हसीना या जणू बांगलादेशच्या वाघीण

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**



बांगलादेशातील काही कडव्या दहशतवादी संघटनांना अफगाणिस्तान पाकिस्तान येथे नेऊन प्रशिक्षण देण्यात आले त्यांना बॉम्ब बनविणे, सरकार विरोधी दंगे करणे, संसदेवर हल्ले करणे इत्यादी बाबतीत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणाचा फायदा घेऊन येथील मंदिरांचा विध्वंस करण्यात आला चितगाव येथील एका हिंदू इस्कॉन मंदिरात कार्य करणाऱ्या एका हिंदू साधूस देशद्रोहाच्या खटल्याखाली तुरुंगात डांबण्यात आले अल्पसंख्याक हिंदू आणि ख्रिश्चन तसेच जैन यांच्या वसती स्थानावर, प्रार्थना ग्रहावर मंदिरावर एका नंतर एक हल्ले करण्यात आले. जेणेकरून त्यांनी आपल्या देशात पळून जावे आणि त्यांची मालमत्ता आपण लुटावी या हेतूने असे हल्ले करण्यात आले आहेत. परंतु मोहम्मद युनूस सरकार मात्र बोटचेपी भूमिका घेत आहे. सध्याच्या सरकारला भारत विरोधी भूमिका घेणाऱ्या गटांना हाताशी धरून हिंसाचार करावयाचा आहे, आता सध्या सत्तेवर असलेल्या मोहम्मद युनुस सरकारचे दिवस भरत आले आहेत. पुढील निवडणुकीच्या काळात बांगलादेशात कोणते राजकीय समीकरण उदयास येईल हे आज सांगता येत नाही.

नवा सत्तागट कोणता

सध्या तरी अवामी लिग पक्ष अल्पमतात आहे. बेगम खालिदा जिया यांचा बीएनपी हा पक्ष सत्तेवर पोहोचण्यासाठी डोक्याला बाशिंग बांधून तयार आहे. त्यांचा मुलगा त्यांचा वारस म्हणून सत्ता मिळविण्यासाठी पुढे सरसावत आहे. तरुणांचा नवा पक्ष अजून असंघटित आहे, त्याला राजकीय अनुभवही नाही त्यामुळे हा पक्ष किती यश मिळवितो हे आज सांगता येत नाही. बांगलादेशात जर आघाडीचे सरकार आले तर त्यात कोणते समीकरण पुढे येईल हे बघावे लागेल.

अवामी लीगचे भविष्य

शेख हसीना यांचा अवामी लिग पक्ष शेख मुजिबूर रहमान यांनी स्थापन केला होता या पक्षाची बैठक निधर्मी आहे बांगलादेशचा राष्ट्रवाद हा बंगाली भाषेवर आधारलेला होता. अमार सोनार बांगला हे रवींद्रनाथ टागोर यांचे गीत त्यांचे राष्ट्रगीत आहे परंतु आता कडवे सनातनी या गीतालाही विरोध करत आहेत. तसेच बांगलादेशातील भारतीय राष्ट्रवादाचे प्रतीक असलेली निवासस्थाने क्रांतिकारकांची घरे, मंदिरे यावर ते लक्ष करत आहेत. ढाका येथील ढाकेश्वरी मंदिर हे हिंदुस्थानातील एक श्रेष्ठ कालीमाता मंदिर म्हणून ओळखले जाते. या मंदिरावर सुद्धा हल्ले करण्याचा





प्रयत्न कडव्या सनातनी मुस्लिम संघटनांनी केला. हे सर्व अंधाकारमय चित्र पाहता मोहम्मद युनूस सरकार डोळे झाकून बसले आहे. आणि शेख हसीना यांचे पुनरागमन कधी झाले, कधी होईल आणि त्यामुळे अवामी लीग पक्षाला काही नवी शक्ती मिळेल काय असा प्रश्न विचारला जातो, परंतु तरी शेख हसीना यांचे पुनरागमन झाल्यानंतर अवामी लीग पक्षाचा पुनर्जन्म होईल असे काही वाटत नाही. जर बांगलादेशचे राजकारण हे गतिमानपणे बदलले, त्यामध्ये काही नाट्यमय घटना घडल्या तरच शेख हसीना यांचे पुनरागमन होऊ शकते. आपले पुनरागमन केव्हा आणि कसे व्हावे याची राजकीय गणिते बांधत सध्या त्या शांत बसल्या आहेत. जेव्हा परिस्थिती आपल्याला अनुकूल आहे असे वाटेल तेव्हा त्या बांगलादेशच्या राजकारणात नाट्यमय उडी घेतील. तोपर्यंत त्यांनी आपला पक्ष वाढविण्याचे सांभाळण्याचे आपल्या मुलावर सोपविले आहे. आणि त्यांच्या पक्षाचे १४ कार्यकर्ते तुरुंगात आहेत दहा नेते बाहेर आहेत. त्यांना पक्ष बांधणी करावयाची आहे. भविष्यात या पक्षाला तेथील ख्रिश्चन हिंदू जैन अल्पसंख्यांकांचा संपूर्ण पाठिंबा मिळेल पण पाकिस्तानवादी कडवे मुस्लिम मात्र या पक्षाला डोळे झाकून विरोध करत आहेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

समारोप

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की बांगलादेश आणि शेख हसीना या दोघांचेही भविष्य अंधकारमय आहे सध्या बांगलादेश अंतर्गत यादवीमुळे खीतपत पडला आहे, तेथील अशांतता हिंसाचार आणि दंगली यामुळे स्थानिक वस्त्रोद्योग आजारी पडला आहे, अमेरिका आणि युरोपात प्रचंड मागणी असूनही येथील कारागीर राजकीय अस्थिरतेमुळे आपल्या उत्पादनाचा पुरवठा करू शकत नाहीत. हे कटू सत्य आहे शिवाय बांगलादेशात शेती उद्योग आणि शिक्षण या तीनही क्षेत्रात कमालीची अस्थिरता आली आहे. शेख हसीना यांनी ज्या पद्धतीने राजकीय स्थैर्य दिले होते ते स्थैर्य मात्र आता हरपले आहे. मोहम्मद युनुस हे अर्थशास्त्रज्ञ आहेत नोबेल पुरस्कार विजेते आहेत. पण त्यांनी निवडून न येता हंगामी सरकार चालविले आहे हे हंगामी सरकार म्हणजे शेख हसीना यांच्या विरोधात काम करणाऱ्या विद्यार्थी आंदोलकांच्या हातातले कळसुत्रे बाहुले बनले आहे. हे कळसुत्री सरकार जनमताचा क्षोभ आला की कधी कोसळेल हे सांगता येत नाही. आगामी निवडणुकीत सरकार जेवढे अप्रिय होईल तेवढे ते नाकारले जाईल बांगलादेशातील लोकांना जेव्हा याची खात्री पटेल की शेख हसीना यांचे सरकार चांगले होते त्यांच्या काळात देशाला चांगले स्थैर्य लाभले होते. आता देश अंधारात वादळात सापडला आहे वादळातून ही नौका बाहेर काढण्यासाठी पुन्हा आगामी लिगची निवड करावी लागेल हे जेव्हा लोकांना कळेल तेव्हा तो सुदिन म्हटला पाहिजे. तूर्त तरी शेख हसीना यांचे भविष्य अंधकारमय आहे असे वाटते त्या हा चक्रव्यूह केव्हा आणि कसा छेदतात यावरच बांगलादेशचे भवितव्य अवलंबून आहे.






# स्वातंत्र्यसैनिक हेमाम नीलमणी सिंग

**ज्योतिर्मय साहित्य**

हेमाम नीलमणी सिंग हे मणिपूरचे सुप्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक, समाज सुधारक आणि मणिपुर राज्याचे शिक्षण उपमंत्री होते. त्यांची ऐतिहासिक ओळख आझाद हिंद सेनेच्या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे प्रमुख सहकारी म्हणून आहे. ब्रम्हदेश (म्यानमार) देशाच्या सीमेवर वसलेलं भौगोलिकदृष्ट्या भारताच्या परिघावरचं मणिपूर हे राज्य म्हणजे दुसऱ्या महायुध्दाच्या उत्तरार्धात भारताच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या झुंजार युद्धाची भूमी होय. या युद्धामागची प्रेरणा आणि सैनिक व मुत्सदी या दोन्ही नात्यांनी त्याचं नेतृत्व करणारे सुभाषचंद्र बोस यांचं नाव भारतातल्या लोकांच्या मनात आणि हृदयात कायमचं कोरलं गेलं आहे. तसंच ब्रिटिश भारताची जुलूमशाही आणि गुलामगिरीतून मुक्तता व्हावी यासाठी मणिपूरला येऊन प्रचंड मोठ्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शूरपणे लढलेल्या आझाद हिंद सेनेच्या सैनिकांना कायम सन्मान मिळत आला आहे. मणिपूरमधल्या आणि सबंध भारतातल्या जनतेच्या मनात हे सैनिक अजरामर झाले आहेत. या संघर्षातला सर्वाधिक संस्मरणीय क्षण १४ एप्रिल १९४४ रोजी आला. एप्रिल १९४४ च्या सुरवातीला आझाद हिंद सेनेच्या बहादूर गटातली (विशेष आघाडी सैन्य) एक तुकडी कर्नल शौकत मलिक यांच्या नेतृत्वाखाली मणिपूरमधील मोइरंगजवळ पोहोचली होती. आझाद हिंद सेनेतील नाकी महंमद या बहादूर गटातील मणिपूर येथील स्थानिक नेताजींचा सहकारी याच्या सहाय्याने मोईरंग येथे पुढील सर्व नियोजन करण्यात आले. नाकी महमंद ब्रिटिश साम्राज्याच्या वतीनं लढण्यासाठी आपली मातृभूमी सोडून गेले होते. ते परतले ते भारताच्या आझाद हिंद सेनेचे एक गुप्तचर प्रमुख सैनिक म्हणून.

मूळ मणिपूरचेच असल्याने नाकी महंमद हे कर्नल शौकत मलिक यांच्या बहादूर गटाचे अर्थातच खूप महत्वाचे सदस्य होते. स्थानिक भाषा बोलत असल्याने तेच सर्वप्रथम मोईरंगमध्ये दाखल झाले आणि त्यांनी एच नीलमणी सिंग यांच्या कुटुंबियाशी संपर्क साधला. एच. नीलमणी सिंग, नाकी महंमद, एम. कोइरेंग सिंग आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी स्थानिक लोकांना आझाद हिंद सेने बद्दल (आयएनए) विषयी माहिती देऊन सर्वांचा पाठींबा मिळविला. मणिपूरची राजधानी इम्फाळच्या दक्षिणेला केवळ पंचवीस मैलावर हे गाव आहे. मोईरंग हे रमणीय लोकटाक सरोवरच्या काठी असलेलं मणिपूरच्या राजांचं प्राचीन सिंहासन होत. आझाद हिंद सेनेच्या आणि जपानी फौजेला इम्फाळवर तीन दिशांनी हल्ला करता यावा म्हणून बहादूर गटाच्या तुकडीनं एच. नीलमणी सिंग यांच्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने मोईरंगमध्ये तळ वसवला. कर्नल शौकत मलिक यांनी एच. नीलमणी सिंग या तरुणाच्या वडिलोपार्जित घरी आपलं मुख्य केंद्र थाटलं. हे साधसं असं घर एच. नीलमणी सिंग यांनी देशाला अर्पण केले असल्याने आता भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक आठवण म्हणून पर्यटकांचं आकर्षणाचं एक मोठं केंद्र आहे. या ऐतिहासिक घरावर मशीनगनच्या खुणा दिसतात.

१४ एप्रिल १९४४ रोजी आझाद हिंद सेनेचे सैनिक, एच. नीलमणी सिंग आणि एम. कोइरेंग सिंग यांच्यासह शेकडो स्थानिक रहिवासी एकत्र आले. कर्नल शौकत मलिक यांनी मोईरंग इथं राष्ट्रीय तिरंगा फडकावाला. केशरी, पांढरा आणि हिरवा असे तीन रंग असलेला आणि मध्यभागी चरख्याचं चिन्ह असलेला तो तिरंगा होता. ब्रिटिश भारताच्या मुख्य भूमीवरचा पहिला स्वतंत्र झालेला प्रदेश म्हणून मोईरंगची इतिहासात नोंद झाली आहे. आझाद हिंद सेनेनं तिरंगा फडकावला तो मणिपुरी दिनदर्शिकेनुसार १४ एप्रिल हा त्यांचा नववर्ष दिवस आहे. कर्नल शौकत मलिक यांनी हिंदुस्थानी भाषेत स्फूर्तिदायक भाषण केलं. एच. नीलमणी सिंग, एम. कोइरेंग सिंग, नाकी महमंद या स्थानिक भाषा व हिंदुस्थानी भाषा येत असणाऱ्यांनी स्थानिक भाषेत कर्नल मलिक यांचे भाषण भाषांतर करून ते स्थानिक लोकांना ऐकवलं. कर्नल मलिक यांनी स्थानिक लोकांना सांगितलं की, मी आणि माझे सैनिक नेताजींनी जाहीर केलेल्या स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारचं प्रतिनिधित्व करत आहोत. दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर राष्ट्रीय तिरंगा फडकावण्याची आझाद हिंद सेनेची प्रतिज्ञा आहे. कर्नल मलिक यांनी या संघर्षात स्थानिक लोकांचा पाठिंबा मागितला. कॅप्टन ईरो हे जपानी आधिकारीदेखील या प्रसंगी बोलले. पुढचे तीन महिने म्हणजे जुलै १९४४ च्या मध्यापर्यंत शौकत मलिक आणि त्यांच्या सैन्यानं मोईरंग येथे तळ ठोकला. एच. नीलमणी सिंग यांचे घरच या सैन्याचं मुख्य ऑफिस होते. स्थानिक लोकांनी दिलेला भात, भाज्या आणि सुके मासे यावर हे सैन्य तग धरून राहिलं. या सर्वांचे नेतृत्व एच. नीलमणी सिंग यांनी केले. यामुळेच नेताजी सुभाषचंद्र बोस भारताच्या त्यांच्या भूमीवर २ जुलै १९४४ रोजी येऊ शकले. नेताजींच्या भारतीय भूमीवरची ही शेवटची चुराचंदपूर येथील आझाद हिंद सेनेच्या सैनिकांच्या तळाला दिलेली भेट.

१८ मार्च १९४४ रोजी आझाद हिंद सेनेच्या पहिल्या तुकड्या ब्रिटिश भारतात शिरल्या. त्यांच्या हल्ल्यामध्ये वेगानं प्रगती होत गेली आणि ब्रिटिशांच सैन्य ब्रम्हदेश सीमारेषेवरून इम्फाळपर्यंत मागे सरकलं. नेताजी जर्मनमधून आशियात लवकर पोहोचले असते आणि त्यांना ईशान्य भारतात १९४३ मध्येच शिरकाव करता आला असता तर ब्रिटीश भारताच्या ईशान्य भागातल्या लढाईचा नकाशा काही वेगळाच दिसू शकला असता. भारतीय भूमीवर सांडणारा रक्ताचा पहिला थेंब एका भारतीयाचाच असायला हवा याप्रमाणे आझाद हिंद सेनेच्या सेनेने जपानी फौजेला बरोबर घेऊन नेताजी यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी दिलेले हे योगदान पुढील काळात भारत देश स्वतंत्र होण्यात मौलिक ठरले.या घटनेमुळे स्थानिक जनता इंग्रजांच्या कह्यात राहणार नाही हे सिध्द झाले. ब्रिटिश सैन्याच्या मदतीला अमेरिकन सैनिक आल्यानंतर ऑपरेशन यू-गो ठरल्याप्रमाणे पुढे जात नाही हे स्पष्ट झाल्यावर जपानच्या ब्रम्हदेश विभाग लष्कराचे कमांडर जनरल मासाकाझू कावाबे यांनी नेताजी यांच्या विनंतीप्रमाणे ८ जुलै १९४४ रोजी माघारीचा आदेश दिला. वास्तविक नेताजी यांनी त्यापूर्वीच यशस्वी माघार घेणे आवश्यक असल्याचे सांगितले होते. नेताजी यांनी शिवाजी महाराजांची युध्दनीती अवगत केली होती. नेताजी यांनी आझाद हिंद सेनेचे या मोहिमेवर प्रमुख असलेले कर्नल महंमद झमन कियानींना १० जुलै १९४४ ला माघारीचा आदेश दिला. ईशान्य भारतातून ब्रम्हदेशाच्या दिशेनं जुलैच्या मध्यानंतर लगेच एका जिगरबाझ माघारीला सुरवात झाली. उपासमार, मोसमी पावसाच्या आगमनामुळे सुरू झालेले मलेरिया, रायफस आणि हगवण यांसारखे रोग आणि ब्रिटिश व अमेरिकन लढाऊ विमानामधून वारंवार होणारे बॉम्बहल्ले यामुळे माघार घेणाऱ्या जपानी आणि आझाद हिंद सेनेतील हजारो सैनिक मृत्युमुखी पडले. माघारीचा आदेश येईपर्यतच्या सर्व घडामोडीत एच. नीलमणी सिंग त्यांच्या सहका-यासह प्रत्येक घडामोडीत आझाद हिंद सेने बरोबर होते. या-३-४ महिन्यात आझाद हिंद सेनेच्या आगमनामुळे आणि त्यांनी दिलेल्या स्वातंत्र्याच्या संदेशामुळे मणिपूरच्या बहुतांश भागात चैतन्य संचारल होतं. या सर्व भागातून आझाद हिंद सेने साठी स्थानिक जनतेने आपल्या पोटाला चिमटा घेत मनापासून प्रचंड सहकार्य केले.

मणिपूरचा संपूर्ण दक्षिण भाग म्हणजे कमीतकमी १०,०००-१२,००० चौरस किलोमीटरचं क्षेत्रफळ जवळजवळ चार महिने आझाद हिंद सरकार च्या अधिपत्याखाली होतं. या सरकारच स्थानिक मुख्यालय मोईरंग येथील एच. नीलमणी सिंग यांचे घरहोते.ब्रिटिश सैन्याने मोईरंग व इतर प्रदेशावर जसा पुन्हा ताबा मिळविला तसे ब्रिटिशांनी १९४४ मध्ये एच. नीलमणी सिंग आणि एच. कोइरेंग सिंग यांना देशद्रोही घोषित केले. एच. नीलमणी सिंग यांनी त्यांच्या घराचा (मोईरंग कोंजेंगबम लेकाई) उपयोग आझाद हिंद सेनेच्या मुख्यालयासाठी करू दिल्याने या परिसराला ब्रिटिशांनी शत्रू पक्ष घोषित केले. एच. नीलमणी सिंग आणि एच कोईरेंग सिंग यांना दिसल्या क्षणी तसेच शोधून लगेच बंदुकीच्या गोळ्या घालण्याचे आदेश देण्यात आले. ब्रिटिशांच्या पोलिसांना गुंगारा देत स्थानिक रहिवाशांच्या सहाय्याने एच.नीलमणी सिंग आणि त्यांच्या सहका-यांनी जंगलात लपून काही दिवस काढले.

२० जुलै १९४४ रोजी सतरा मणिपुरी तरुणांचं एक पथक आपापल्या घरांमधुन बाहेर पडून जीवाच्या आकांताने जंगल पर्वत पार करीत तीन महिन्यानी रंगूनला पोहोचले. याचे नेतृत्व एच नीलमणी सिंग आणि एम. कोइरेंगे सिंग यांनी केले. यामध्ये पंधरा तरुण होते तसेच केइन्या देवी भाणि रंधोनी देवी या दोन तरुणी होत्या. हे सर्वजण निखिल मणिपुरी महासभा या देशभक्तिपर संघटनेचे सदस्य होते. हवेतून होणारा बॉम्बहल्ला चुकवण्यासाठी ते दिवसा लपून बसत आणि रात्री पुढे कूच करत.रंगुनला गेल्यावर नेताजी यांच्याबरोबर एच.नीलमणी सिंग आणि त्यांच्या सर्व सहका-यांची बैठक झाली. एच. नीलमणी सिंग यांनी त्यांचे वडील एच. थांबलजाओ सिंग यांनी त्यांच्याकडे आपल्या आयुष्यभराची सगळी बचत म्हणजे तीन हजार रूपये नेताजींकडे चळवळीसाठी द्यायल म्हणून सोपवले होते ते त्यांनी सुपूर्त केले. नेताजींनी कृतज्ञतेने त्याचा स्वीकार केला. हे सर्व १७ जण आझाद हिंद सेने मध्ये दाखल झाले. मे १९४५ मध्ये ब्रिटिशांनी जेव्हा रंगून पुन्हा ताब्यात घेतले तेव्हा मणिपुरी देशभक्तांना अटक झाली. सात महिने रंगुनच्या मध्यवर्ती कारागृहात ठेऊन नंतर त्यांची रवानगी कलकत्त्यात केली गेली.ब्रिटिशांकडून अटक झाल्यानंतर एच नीलमणी सिंग आणि इतरांची १९४६ साली मुक्तता करण्यात आली. सर्वांचे मणिपूर मध्ये हजारोंच्या संख्येने नागरिकांनी त्यांचे स्वागत केले. १९१५ साली मोईरंग येथे जन्मलेल्या एच नीलमणी सिंग यांनी पुन्हा सामाजिक व शैक्षणिक कार्यात सहभाग घेतला. स्वातंत्र्यानंतर एच. नीलमणी सिंग यांनी मणिपूरच्या उपशिक्षणमंत्रीपदी काम केले. त्यांनी शिक्षण क्षेत्रातील अनेक सुधारणा राबविल्या. विशेषतः उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. महिला सक्षमीकरणासाठी महत्वपूर्ण मार्गक्रमण केले. त्यांनी मोईरंग कॉलेजमध्ये विज्ञान शाखा सुरू होईपर्यंत फक्त एक वेळ जेवण घेण्याचा संकल्प करून तो तडीस नेला आणि विज्ञान शाखा चालू झाली. स्वतःच्या निवासस्थानाचा आझाद हिंद सेने च्या आठवणीचे संग्रहालय निर्माण करण्यासाठीचा प्रकल्प त्यांनी पूर्ण केला. आज आपणाला मोईरंग येथे आझाद हिंद सेनेच्या ऐतिहासिक वस्तू, छायाचित्र आणि महत्त्वाच्या घटना या ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या घरात वेगवेगळ्या दालनात जगातील सर्व पर्यटकांना बघायला मिळतात. हिंदी भाषेचा प्रचार करीत राष्ट्रीय एकात्मतेसाठी मणिपूर येथे महत्वाची भूमिका आयुष्याच्या शेवटपर्यंत ते देत राहिले.

२०२५ मध्ये एच नीलमणी सिंग यांच्या ११० व्या जयंतीनिमित्त एच. नीलमणी सिंग यांचा मरणोत्तर सन्मान भारत विकास परिषद आणि मणिपुर सरकारच्या वतीने करण्यात आला. हा सन्मान आझाद हिंद सेने तील सहभागाने, मणिपुर स्वातंत्र्य संग्रामातील अतुलनीय योगदान आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील भूमिकेसाठी दिला गेला. या कार्यक्रमासाठी देशाचे गृहमंत्री अमित शाह उपस्थित होते. यावेळी त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि स्वातंत्र्यलढा कार्याचे स्मरण विशेषत्वाने केले गेले. मणिपूर मंत्रीमंडळ तसेच स्वातंत्र्यसैनिकांचे वारसही या कार्यक्रमास उपस्थित होते. या सोहळ्यामुळे हा सन्मान समारंभ राष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचा घटनाक्रम म्हणून त्याची ऐतिहासिक नोंद झाली आहे. एच नीलमणी सिंग यांचे कार्य हा मणिपूर आणि पूर्वेत्तर भारतातील स्वतंत्र संघर्षाचा उज्वल भाग आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे आझाद हिंद चळवळीला तसेच पहिल्या आझाद हिंद सरकारला बळ मिळाले. मणिपूर भारतामध्ये विलिन होण्यासाठी त्यांचे नेतृत्व महत्वाचे ठरले.





शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051



## अंबादेवी ट्रस्टचा गरीबांचा दवाखाना नव्या जागेत, किर्तन सभागृह व ग्रंथालय इमारतीत नाममात्र दरात सेवा सुरु

**ज्योतिर्मय साहित्य**

**अमरावती –** गरीबांचा दवाखाना म्हणून ओळख असलेले अंबादेवी ट्रस्ट रुग्णालय आता अंबादेवी मंदिराजवळील किर्तन सभागृह व ग्रंथालयाच्या इमारतीत सुरू करण्यात आले आहे. हा दवाखाना अत्यंत नाममात्र दरात वैद्यकीय सेवा पुरवतो आणि येथे शहरातील नामवंत वैद्यकही आपली सेवा देतात.

पूर्वी हे रुग्णालय राजकमल चौक ते अंबादेवी मंदिर रस्त्यावरील जोशी ट्रस्टच्या इमारतीत होते. ती इमारत जीर्ण झाल्यामुळे दवाखाना नव्या जागेत हलवण्यात आला आहे. येथे सर्व प्रकारच्या पॅथोलॉजीकल चाचण्या, रक्त व थुंकी तपासणी, एक्स-रे, सोनोग्राफी आदी सुविधा उपलब्ध आहेत.

या रुग्णालयात रक्ताचे डझनभर घटक तपासणारे विशेष यंत्र आहे, जे शहरातील निवडक रुग्णालयांमध्येच उपलब्ध आहे. या सर्व सेवा नाममात्र दरात उपलब्ध असल्याने गरीबांचा दवाखाना अशी याची ओळख आहे. याच इमारतीत सुसज्ज किर्तन हॉल आणि प्राचीन व अद्ययावत पुस्तकांचे समृद्ध ग्रंथालयही आहे.

आगामी २१ नोव्हेंबरपासून अंबादेवी मंदिरात तीन दिवसीय संगीत समारोह आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने विश्वस्तांनी माध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली.

यावेळी श्री अंबादेवी संस्थानचे सचिव रवींद्र कर्वे, कोषाध्यक्ष विलास मराठे, ग्रंथालय विभागाच्या प्रमुख दीपा खांडेकर, विश्वस्त अशोक खंडेलवाल, भक्त निवासचे प्रमुख ॲड. राजेंद्र पांडे, व्यवस्थापक सूर्यकांत कोल्हे, सह व्यवस्थापक सुरेंद्र बुरंगे, मकूंद घड्याळपाटील, प्रदीप अंदुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री अंबादेवी संस्थानतर्फे दरवर्षी आयोजित केला जाणारा संगीत सेवा समारोह शुक्रवार, २१ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. पहिल्या दिवशी पुण्याचे पंडित रघुनंदन पणशीकर यांचे गायन आणि कोलकाता येथील रागेश्री दास यांची संगीत मैफल होईल. २२ नोव्हेंबरला धारवाडचे पं. कुमार मरडूर यांचे गायन तर पं. पूर्वायन चटर्जी यांचे सतारवादन होईल. समारोपीय कार्यक्रमात २३ नोव्हेंबरला जुळ्या बहिणी रजनी व गायत्री यांचे गायन आणि अनुव्रत चटर्जी यांचे तबलावादन होईल.

## पुणे पुस्तक महोत्सवाचे १३ ते २१ डिसेंबर दरम्यान आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे–** पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन यंदा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्याचा प्रयत्न सुरू आहे. हा महोत्सव १३ ते २१ डिसेंबर दरम्यान फर्ग्युसन कॉलेज मैदानावर आयोजित करण्यात येणार आहे. महोत्सवाला देशभरातील अनेक मान्यवर उपस्थित राहतील, अशी माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले की, हा महोत्सव दर्जेदार होण्यासाठी विविध कल्पना अंमलात आणल्या जात आहेत. आगामी काळात पुणे पुस्तक महोत्सव जगाची पुस्तकांची राजधानी म्हणून नावारूपाला येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते पुणे पुस्तक महोत्सव २०२५ च्या मांडव उभारणी आणि वासा पूजन समारंभावेळी बोलत होते.

यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यवाह प्रवीण दबडघाव, राष्ट्रीय पुस्तक न्यास अध्यक्ष मिलिंद मराठे, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू पराग काळकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठाचे डॉ. यशराज पाटील, उद्योजक कृष्णकुमार गोयल, विशाल चोरडिया, डेक्कन संस्थेचे अध्यक्ष प्रमोद रावत, ज्येष्ठ पत्रकार किरण ठाकूर, अभिनेते प्रवीण तरडे, रमेश परदेशी आणि पुणे पुस्तक संयोजन समितीचे मुख्य संयोजक राजेश पांडे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी जयपूर लिटरेचर फेस्टिव्हलचा संदर्भ देत सांगितले की, पुणे हे शिक्षण आणि सांस्कृतिक शहर आहे. मागील वर्षी २५ लाख लोकांनी या महोत्सवाला भेट दिली होती, त्यामुळे यंदा त्याला जागतिक दर्जा देणे आवश्यक आहे. पुढील वर्षी पुण्यात वर्ल्ड बुक फेस्टिव्हल आयोजित करण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. सोशल मीडियामुळे तरुणांचे पुस्तक वाचन कमी झाले असून, पुण्यातील ७० विद्यापीठे आणि ७५० महाविद्यालयांनी या महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

पुणे पुस्तक संयोजन समितीचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी माहिती दिली की, पहिल्या वर्षी २५०, दुसऱ्या वर्षी ६५० आणि यंदा ८०० स्टॉल्सचे अल्पावधीत बुकिंग झाले आहे. दिल्लीतील जागतिक पुस्तक महोत्सवानंतर पुणे पुस्तक महोत्सव हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा महोत्सव ठरला आहे. पुण्याला पुस्तकांची जागतिक राजधानी बनवण्याचे उद्दिष्ट असून, सात दिवसांत १५० व्याख्याने आणि सुमारे ७० पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे.

## जल्लोष लोककलेचा स्पर्धेमध्ये अमृतवाहिनी विद्यालय सर्वोत्कृष्ट

**ज्योतिर्मय साहित्य**

**अहिल्यानगर–** बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित आणि अहिल्यानगर शाखा संचालित जल्लोष लोककलेचा महोत्सव नुकताच रेणावीकर विद्यालयात उत्साहात पार पडला. या महोत्सवात लोककलेशी निगडित समूहगीत गायन, एकल गीत गायन, समूह नृत्य व एकल नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये जिल्ह्यातून २६१ बाल कलावंतांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत प्रोत्साहनात्मक ३८ हजार रुपयांची रोख पारितोषिके सुद्धा त्यांनी पटकावली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध रंगकर्मी नाना भाऊ मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून शास्त्रीय गायक पवन नाईक, सतीश लोटके, अनंत जोशी उपस्थित होते.

जल्लोष लोककलेचा हा असा महोत्सव आहे जो पूर्णपणे लोककलेशी समर्पित व बालरंगभूमीशी घट्ट नाळ जोडलेला असल्याबद्दल समाधान व्यक्त करीत पावन नाईक यांनी विजेत्यांना शुभेच्छा दिल्या. लोककलांचा प्रगल्भ वारसा असलेल्या आपल्या महाराष्ट्रात लोककलांना उर्जितावस्था प्राप्त व्हावी, यासाठी बालरंगभूमी परिषदेने स्वतःची एक स्वतंत्र भूमिका स्वीकारली आहे. केवळ महोत्सवी किंवा मनोरंजनात्मक असे स्वरुप न ठेवता ही लोकचळवळ व्हावी अशी इच्छा परिषदेचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी व्यक्त केली.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रसाद सुवर्णपाठकी, संकेत सुवर्णपाठकी, लकी छजलानी,अमृता बेडेकर, अनुजा कुलकर्णी, तेजश्री मैड व शीतल परदेशी यांनी काम पहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली दरेकर व सुजाता पायमोडे यांनी केले तर आभार शैलेश देशमुख यांनी मानले. यावेळी स्पर्धा प्रमुख म्हणून सागर अलचेट्टी यांनी महत्वाची भूमिका बजावली तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी अहिल्यानगरच्या संपूर्ण कार्यकारिणीने परिश्रम घेतले.

या स्पर्धेत समूहनृत्य स्पर्धा प्रकारात सर्वोत्कृष्ट- अमृतवाहिनी स्कूल संगमनेर, उत्कृष्ट-नृत्यदर्पण अकादमी, उत्तम-अपोस्ट्रोफी डान्स अकादमीने पारितोषिक मिळवले. एकलनृत्य स्पर्धा प्रकारात सर्वोत्कृष्ट- त्रिशा कदम, उत्कृष्ट - टीना वाघ,उत्तम-काव्या काथोरे, प्रशंसनीय-वेदिका कुलकर्णी व अरित्रिका गायकवाड यांनी यश संपादन केले. समूह गायन स्पर्धा प्रकारात सर्वोत्कृष्ट- अमृतवाहिनी इंट.स्कूल, संगमनेर, उत्कृष्ट-हार्मनी इंट. स्कूलने विजय मिळवला. एकल वाद्य वादन प्रकारात सर्वोत्कृष्ट-ओंकार वाघमारे, उत्कृष्ट - क्षितिज मुसळे, उत्तम-सात्विक शिंदे यांनी यश मिळवले. एकल गायन प्रकारात सर्वोत्कृष्ट-साई कोष्टी, उत्कृष्ट-सिद्धी वाघमारे, अनुष्का साठे, उत्तम-सोहम फटांगरे, श्राव्या सहाणे, प्रशंसनीय-रिद्धी वाघमारे व अदिती आढाव. उल्लेखनीय-ध्वज मुनोत यांनी पारितोषिके मिळवली. तसेच या महोत्सवानंतर दिव्यांग मुलांसाठी यहा के हम सिकंदर'' हा राज्यस्तरीय महोत्सव घेण्यात येणार असल्याची माहिती बालरंगभूमी परिषदेच्यावतीने देण्यात आली. लोककलांचा प्रगल्भ वारसा असलेल्या आपल्या महाराष्ट्रात लोककलांना उर्जितावस्था प्राप्त व्हावी, यासाठी बालरंगभूमी परिषदेने स्वतःची एक स्वतंत्र भूमिका स्वीकारली आहे. ही लोकचळवळ व्हावी अशी इच्छा परिषदेचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी व्यक्त केली.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559